वसंतदादा पाटील महाविद्यालय, पाटोदा

गृहशास्त्र विभाग

शैक्षणिक भेट अहवाल २०१९-२०२०

आरोग्य आणि स्वच्छता या विषयाच्या अनुषंगाने गृहशास्त्र विषयाच्या विद्यार्थ्यांसाठी ग्रामीण रुग्णालय पाटोदा येथे दिनांक ०८/०१/२०२० रोजी शैक्षणिक भेट आयोजित करण्यात आली. या भेटीतून विद्यार्थ्यांना तेथील स्वच्छता, विविध विभाग, पिण्याच्या पाण्याचे व्यवस्थापन, गप्पी मासे पैदास केंद्र, याची पाहणी केली. विविध विभाग या मध्ये क्ष -किरण विभाग,आपत्कालीन विभाग (मलमपट्टी /नर्सिंग स्टेशन),पॅथॉलॉजी लॅब येथे जाऊन तेथील कर्मचाऱ्यांशी चर्चा करून त्याबद्दलची माहिती घेण्यात आली. रुग्णालायातील भिंती खूप बोलक्या होत्या कारण त्यावर माहितीदर्शक फलके, पोस्टर लावलेली होती. त्यामधून विविध सामाजिक समस्या, आरोग्यविषयक समस्या , आजारांचे लक्षणे व त्यावरील उपाययोजना,आरोग्यासंबंधित विविध शासकीय योजना या विषयांची माहिती नजरेत येत होती. राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियान म्हणजेच आयुष विभागाद्वारे आयुर्वेद, होमिओपॅथी, युनानी योग्य व निसर्गोपचार निदान व उपचार चिकित्सा सेवा याविषयीची माहिती डॉ.सारिका माने यांच्याकडून मिळाली. रुग्णालयातील भिंतीवर स्वच्छता राखा, स्वछतेचे महत्व यांची फलक लावलेली होती. तेथील नर्स यांच्याशी संवाद साधून मनातील शंका, प्रश्न यांचे निराकरण करण्याचा प्रयत्न केला गेला. या भेटीतून गप्पी मासे पैदास केंद्र या उपक्रमाची माहिती मिळाली. गप्पी मासे साठविलेल्या पाण्यात असतील तर पाण्यामुळे उत्पन्न होणाऱ्या डासांची उत्पत्ती थांबवता येते. ग्रामीण रुग्न्यालयातील वैद्यकीय अधिकारी यांची भेट घेऊन विविध उपक्रमांचा आढावा घेण्यात आला, या भेटी साठी गेलेले सर्व विद्यार्थी व प्राध्यापक यांना तेथील सर्व कर्मचाऱ्यांनी सहकार्य केले.

१) प्रा. अर्चना चवरे

२) प्रा. मनिषा गाढवे — प्राचार्य

# *Visit to Rural Hospital from Department of Home Science*










